पंचायत समिती स्तरावर होणा-या मासिक बैठकीमध्ये ग्राम सभेचे इतिवृत्त आणण्याबाबत.

पंचायत राज समितीची या बाबतची शिफारस,

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,

परिपत्रक क्र. व्हीपीएम २६८७/८३२/३०८०/२१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक २९ जून १९८८

वाचा:- १] ग्राम विकास विभाग, परिपत्रक क्र. पीआरसी १०७७/२७०३/सीआर २७३२ तेवीस, दिनांक १२ सप्टेंबर १९७८.

२] ग्राम विकास विभाग, परिपत्रक क्र. व्हीपीएम २६८७/२९२८/२१ दिनांक २६ मे १९८७

परिपत्रक:- पंचायत राज समितीने ग्राम पंचायतीच्या ग्रामसभा व मासिक सभा नियमितपणे घेतल्या जात नाहीत या विषयाबाबत वेळोवेळी शिफारशी केल्या होत्या. त्याचे अनुषंगाने या विभागाने वर निर्देशित केलेले दि. १२. सप्टेंबर १९७८ च्या परिपत्रका नुसार सविस्तर आदेश निर्गमित केलेले आहेत. [प्रत संदर्भासाठी जोडलेली आहे.] ग्राम सभा नियमितपणे घेण्याबाबत शासनाने ग्राम विकास विभाग परिपत्रक क्र. व्हीपीएम २६८७/२९२८/२१ दिनांक २६ मे १९८७ अन्वये सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ग्राम सभा व मासिक सभा नियमितपणे घेण्याबाबत आदेश दिलेले आहेत आणि या बाबत कसूर करणा-या सरपंच/उपसरपंच, तसेच ग्राम पंचायतीचे सचिव या नात्याने ग्राम सेवक यांचेवर कडक कार्यवाही करावी असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

शासनाच्या आता असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, अशा प्रकारे वेळोवेळी आदेश निर्गमित करूनही ग्राम सभा विहित नियमानुसार नियमितपणे घेतल्या जात नाहीत. यासाठी यापुढे ग्राम पंचायतीचे सचिवानी [ग्राम सेवक] आपल्या पंचायतीच्या आयोजित केलेल्या ग्राम सभा मासिक सभा यांच्या मंजूर इतिवृत्ताची एक प्रत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांचेकडे पाठवावी. पंचायत समिती स्तरावर होणा-या मासिक बैठकीमध्ये ग्रामपंचायतींनी त्यांच्या क्षेत्रातील ग्रामसभा /मासिक सभा विहित नियमानुसार घेतल्या किंवा नाही. याबाबतचा आढावा घ्यावा व आवश्यक कार्यवाहीकरिता गट विकास अधिका-यांनी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे याबाबतचा अहवाल सादर करावा.

३. जिल्हा परिषदेच्या सर्व मुख्य कार्यकारी अधिका-यांनी या सूचना गट विकास अधिका-यांच्या नजरेस आणाव्यात तसेच या आदेशांचे पालन करण्यात कसूर करणा-या सरपंच/उपसरपंच यांच्या विरुद्ध व ग्राम सेवका विरुद्धही उचित कार्यवाही करावी. तसेच पंचायत समिती व जिल्हा स्तरावर ज्या ज्या वेळी ग्राम पंचायतीची तपासणी होईल. त्या त्या वेळी या संदर्भात अधिका-यांनी पडताळणी करावी व त्या बाबतचा अहवाल पुढील त्वरित पाठपुराव्यासाठी संबंधित अधिका-यांकडे पाठवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ सु. श्री. कुळकर्णी ]

उप सचिव, महाराष्ट्र शासन

ग्राम पंचायतीची ग्रामसभा व मासिक सभा

पंचायत राज समितीची शिफारस

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक: पीआरसी-१०७७/२७०३/[सीआर-२७३२]तेवीस
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक १२ सप्टेंबर १९७८

परिपत्रक:-पंचायत राज समितीच्या सन १९७६-७७ च्या नवव्या अहवालातील परिच्छेद क्रमांक २.१९, ६.३२, ८.१७ आणि १२.९ मध्ये ग्रामसभा व मासिक सभा नियमीतपणे न घेण्याबद्दल समितीने असमाधान व्यक्त केले आहे.

२. या संदर्भात अनुक्रमे शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्रमांक-व्हीपीएम-१३७५/३५५५/२३, दिनांक १० फेब्रुवारी १९७६ व क्रमांक पीआरसी-१०७६/२४१०/तेवीस दिनांक ७ जानेवारी १९७७ कडे लक्ष वेधण्यात येत आहे. दिनांक १० फेब्रुवारी १९७६ च्या परिपत्रक असे स्पष्टीकरण करण्यात आले आहे. की, मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम ७ पोट कलम [१]व मुंबई ग्रामपंचायत [ग्राम सभेच्या बैठकी] नियम १९५९ चे नियम ३, पोट कलम [१] अन्वये सरपंच किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपसरपंच यांचेवर कमीत कमी दोन ग्राम सभेच्या बैठकी घेण्याची कायदेशीर जबाबदारी आहे. त्यात असेही नमूद करण्यात आले आहे की, दोन ग्रामसभेच्या बैठकी घेण्यात कसूर केली तर ती व्यक्ती सरपंच/उपसरपंच म्हणून काम करण्यास अनर्ह ठरते. तसेच दि. ७ जानेवारी १९७७ च्या परिपत्रकात सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना असे आदेश देण्यात आले आहेत की, त्यांनी ग्रामसभा व मासिक सभा हया नियमितपणे घेता येतील. याची दक्षता घ्यावी व कसूर करणाऱ्या सरपंच/ग्रामसेवक यांचेविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी. असे आदेश असताना सुध्दा संबंधित अधिकाऱ्यांच्या उदासिन वृत्तीमुळे ग्रामसभा व मासिक सभा या नियमितपणे घेण्यात येत नाहीत असे दिसून येते.

३. मुंबई ग्रामपंचायतीचे अधिनियम १९५८ चे कलम ७ पोट कलम[१] व मुंबई ग्राम पंचायत [ग्रामसभेच्या बैठकी] नियम १९५९ चे नियम ३ पोट नियम[१] अन्वये प्रत्येक वित्तीय वर्षातील ग्रामसभेची पहिली सभाही, त्या वर्षाच्या सुरवातीनंतर दोन महिन्याच्या आंत भरविण्यात आली पाहिजे आणि दुसरी सभाही प्रत्येक वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यात भरविण्यात आली पाहिजे. तसेच उपरोक्त नियमाचे पोटकलम [२] अन्वये आणखी दोन बैठकी पहिली ऑगस्ट महिन्यामध्ये व दुसरी २६ जानेवारी रोजी घेतल्या पाहिजे. याप्रमाणे नमूद केलेल्या अवधीत ग्रामसभेच्या बैठकी घेणे सरपंचास त्यांच्या अनुपस्थितीत उपसरपंचास व ग्रामपंचायतीच्या सचिवास आवश्यक आहे.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ७ मध्ये नमूद केलेल्या दोन ग्रामसभापैकी कोणतीही एक ग्राम सेवा भरविण्यास चुकला तर तो सरपंच/उपसरपंच म्हणून चालू रहाण्यास शिवा पंचायतीच्या सदस्यांच्या उरलेल्या पदावधीसाठी निवडला जाण्यास अनर्ह ठरेल तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३६ अन्वये जर सरपंच/उपसरपंच, पुरेशा कारणाशिवाय, कोणत्याही वित्तीय वर्षात पंचायतीच्या सभा बोलविण्यास चुकेल तर तो सरपंच/उपसरपंच

...२/-

जिल्हाधिकारी कार्यालय,

म्हणून चालू रहाण्यास किंवा पंचायतीच्या सदस्याच्या पदाच्या उरलेल्या कालावधीसाठी सरपंच किंवा उपसरपंच म्हणून निवडला जाण्यास अपात्र ठरेल, अशी कायदेशीर तरतूद असूनसुध्दा व वेळोवेळी याबद्दल आदेश दिले असतांना सुध्दा सरपंच व ग्राम पंचायत सचिव यांच्या निरुत्साही वृत्तीमुळे या बैठकी नियमीतपणे होण्यात येत नाहीत हे पाहून शासनास खेद वाटतो. जिल्हा परिषदांच्या सर्व मुख्य कार्यकारी अधिका-यांना शासन असे आदेश देत आहे की, त्यांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समितीचे सभासद, गट विकास अधिकारी यांना ग्रामसभेच्या व मासिक सभेच्या बैठकी वेळोवेळी व नियमाप्रमाणे होण्यात येतात या बाबतीत दक्षता होण्याबद्दल भाग पाडावे, याबद्दल तपासणी करणारे अधिकारी किंवा सरपंच/ग्रामसेवक यांच्याकडून याबाबतीत लोप किंवा उदासिनता झाली तर त्याचीगंभीर दखल घेऊन अशा व्यक्ती-विरुध्द कडक कारवाई करण्यात यावी. जिल्हा परिषदांच्या सर्व मुख्य कार्यकारी अधिका-यांना अशी विनंती करण्यात येते की, त्यांनी गट विकास अधिका-यांना शक्य तितक्या ग्रामसभेच्या व मासिक सभेच्या बैठकीस हजर राहून मार्गदर्शन करण्याबद्दल सूचना द्याव्यात.

४. जिल्हा परिषदेच्या सर्व मुख्य कार्यकारी अधिका-यांना अशी विनंती करण्यात येते की, त्यांनी गट विकास अधिका-यांना अशा सूचना द्याव्यात की, त्यांनी ग्रामपंचायत सचिवांच्या मासिक सभेत, ग्रामसभेच्या बैठकीसाठी जास्तीत जास्त लोक हजर रहाण्यासाठी कोणत्या रितीने मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी द्यावी व याबद्दल कोणती उपाय योजना आखण्यात यावी याबद्दल त्यांनी योग्य निर्णय घ्यावा.

महाराष्ट्र चे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
[भि. बी. जोशी]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
जिल्हा परिषदांचे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हाधिकारी,
पंचायत समितीचे गट विकास अधिकारी,
कार्यासन क्रमांक २६ ग्राम विकास विभाग,
कार्यासन क्रमांक २३ निवडक नस्तीसाठी.